# माऊली ग्रुपचे प्राचार्य व प्राध्यापकांची विद्यापीठांतर्गत विद्याशाखा व अभ्यास मंडळांवर निवड



प्राचार्य डॉ.जाधव



प्रा.डॉ.बेग



प्रा.डॉ.अर्धापुरकर

**शेगाव** ▪ तालुका प्रतिनिधी

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदींनुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत विविध विद्याशाखा व शिकविण्यात येणाऱ्या विषयांच्या अभ्यास मंडळावर संबंधित विषयाचे उच्चविद्या विभूषित विषयतज्ञांची निवड विद्यापीठाने नुकतीच केली आहे.

अमरावती विभागात शैक्षणिक क्षेत्रात अल्पावधीतच एक वेगळं स्थाननिर्माण करून दर्जेदार शिक्षण व मुल्यधिष्टीत अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण देणारी संस्था म्हणून नावारूपास आलेल्या शेगाव येथील वै. पुरुषोत्तम हरी गणेश पाटील शिक्षण संस्थाद्वारा संचालित माऊली ग्रुप ऑफ इंस्टीट्युशन कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड टेक्नॉलॉजी शेगाव या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी. एम. जाधव यांची विद्यापीठच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या मंडळावर सदस्य पदी एकमताने निवड करण्यात आली आहे.

बुलडाणा जिल्हयातील एकमेव संस्थेच्या प्राचार्य व प्राध्यापकांना शैक्षणिक क्षेत्रात संपूर्ण विभागात नेतृत्वाची मिळालेली संधी ही परिसरासाठी गौरवाची बाब आहे. २१ सप्टेंबर २०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेत ही निवड करण्यात आली असून इलेक्ट्रॉनीक्स, इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड अप्लाइड इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या अभ्यास मंडळावर ते सदस्य आहेत.

तसेच २६ सप्टेंबर २०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेत इलेक्ट्रॉनिक्स इंस्ट्रूमेंटेशन, कॉम्प्युटर मेन्टनन्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर हार्डवेअर विषयाच्या अभ्यास मंडळावर सुद्धा प्राचार्य डॉ. सी. एम. जाधव यांची स्वीकृत सदस्य पदी निवड करण्यात आली आहे.इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. एम.ए.बेग यांची सुद्धा विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या मंडळावर सदस्य पदी निवड झाली असून २७ सप्टेंबर २०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेत इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रीकल पावर सिस्टीम विषयाच्या अभ्यास मंडळावर डॉ. बेग यांची सदस्यपदी निवड करण्यात आलेली आहे.तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. पी.आम.अर्धापुरकर यांची अधिसूचना क्र. १२९/२०१९ नुसार विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत मेकॅनिकल इंजिनिअरिंग विषयाच्या अभ्यास मंडळावर स्वीकृत सदस्य पदी नियुक्तीकरण्यात आली आहे.

## अभिनंदन व शुभेच्छा

विद्यापीठांतर्गत निवड झाल्यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात गौरवाची आनखी एक भर पडली आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री ज्ञानेश्वरदादा पाटील यांनी माऊली ग्रुपच्या उच्चविद्या विभूषित प्राचार्य व प्राध्यापकांच्या विद्यापीठस्तराव झालेल्या निवडीबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

ePaper देशोन्नती
Fri, 15 November 2019
https://deshonnati.digitaleditior